# नागरिकांची सनद

**१६ ऑगस्ट २०१३**

तन्मय कानिटकर

GreenEarth

GreenEarth Social Development Consulting Pvt. Ltd.
contactus.greenearth@gmail.com

(शासन व्यवस्थेच्या नीलप्रतीसाठी)

# नागरिकांची सनद

नागरिकांना शासनातर्फे मिळणाऱ्या सेवा आणि वस्तू ठराविक कालावधीमध्ये मिळाव्यात, त्या मिळण्यामध्ये विलंब केला जाऊ नये आणि पर्यायाने होणारा भ्रष्टाचार कमी करावा असा उद्देश 'नागरिकांची सनद' या संकल्पनेमागे आहे. त्याचसाठी लोकसभेमध्ये "The Right of citizens for time bound delivery of goods and services and redressal of their grievances bill, 2011" हे विधेयक मांडण्यात आलेले आहे. या विधेयकातील प्रमुख तरतूदी आणि ठळक मुद्दे येथे पाहता येतील-
http://www.prsindia.org/uploads/media/Citizen%20charter/Legislative%20Brief%20Citizens%20Charter%2027%20Sep.pdf

## महाराष्ट्रात नागरिकांची सनद कायदा

वरील विधेयक पारित होऊन त्याचे रुपांतर कायद्यामध्ये झाले तरी ते महाराष्ट्र सरकारला किंवा कोणत्याही राज्य सरकारांना थेट लागू होईल की नाही याबाबत संदिग्धता आहे. कारण या विधेयकानुसार राज्य आणि केंद्र पातळीवरील तक्रारींचे निवारण करण्यासाठी आयोग नेमण्याची तरतूद आहे. असे आयोग नेमण्याचा अधिकार राज्य सरकारांचा असून हे संविधानातील राज्य यादीत आहे.

मात्र, "actionable wrongs" ही संयुक्त यादीतील[1] बाब असल्याने संसद हा कायदा बनवू शकते ही सरकारची भूमिका आहे.

## महाराष्ट्रातील अस्तित्वात असलेला कायदा

नागरिकांची सनद आणि त्याविषयीच्या तक्रारींचे निवारण करण्याच्या दृष्टीने यंत्रणा उभारणे असा स्वतंत्र कायदा महाराष्ट्रात अस्तित्वात नसला तरी नागरिकांना शासकीय सेवा व वस्तू वेळेत मिळाव्यात यासाठी कायदेशीर तरतूद करण्यात आलेली आहे.

[1] संयुक्त यादीतील विषय क्र. ८.

**'महाराष्ट्र शासकीय कर्मचाऱ्यांच्या बदल्यांचे विनियमन आणि शासकीय कर्तव्ये पार पाडताना होणाऱ्या विलंबास प्रतिबंध अधिनियम २००५'** या कायद्यातील कलम ८ ते १२ ही शासकीय कर्तव्य पार पडताना विलंब टाळण्याबाबत बोलतात. हा कायदा १ जुलै २००६ पासून राज्यात लागू झाला.

कलम ८ नुसार प्रत्येक शासकीय कार्यालयाने/ विभागाने कायदा अंमलात आल्यापासून सहा महिन्याच्या आत आपल्या विभागासाठी नागरिकांची सनद बनवणे अपेक्षित आहे.[2] प्रत्येक कर्मचारी आणि अधिकारी यांची कर्तव्ये आणि प्रत्येक कामासाठी लागणारा वेळ इत्यादी नक्की करून ते प्रसिद्ध करेल अशीही तरतूद कायद्यात आहे. ज्या शासकीय कर्मचाऱ्यास/ अधिकाऱ्यास कर्तव्य बजावताना विलंब लागेल, किंवा जो कर्मचारी/अधिकारी जाणून बुजून विलंब लावेल तो शिस्तभंगाच्या कारवाईस सामोरा जाण्यास पत्र असेल असे हा कायदा सांगतो.

मात्र, या कायद्याची अंमलबजावणी प्रभावी रीतीने न झाल्याने मुंबई उच्च न्यायालयात याचिका दाखल करण्यात आली. या याचिकेमध्ये उच्च न्यायालयाने जनतेच्या निवेदने/अर्जांचा निपटारा १२ आठवड्यांच्या आत करावा असे निर्देश दिले आहेत. त्याला अनुसरून शासनाने १८ जानेवारी २०१३ रोजी परिपत्रक काढून जनतेच्या निवेदने/अर्जांवर १२ आठवड्यात निर्णय घ्यावा असे निर्देश सर्व शासकीय विभागांना दिले आहेत.

## स्वतंत्र तक्रार निवारण यंत्रणा

राज्याच्या कायद्यानुसार नागरिकांची सनद अस्तित्वात असली तरी त्याविषयी तक्रार निवारण करण्याची यंत्रणा पुरेशी आणि प्रभावी नाही. सध्या लोकसभेत प्रस्तावित नागरिकांची सनद विधेयकातील काही तरतूदी माहिती अधिकार कायद्याच्या धर्तीवर करण्यात आल्या आहेत. उदा. राज्य आणि केंद्र पातळीवर आयोग नेमण्याची तरतूद. तसेच या कायद्यानुसार प्रत्येक सरकारी कार्यालयात/ विभागात जनमाहिती अधिकाऱ्याप्रमाणेच तक्रार निवारण अधिकारी नेमणे बंधनकारक असेल. तक्रार दाखल केल्यावर त्यावर निर्णय घेण्यासाठी ३० दिवसांची मुदत आहे. या मुदतीत तक्रारीचे निवारण झाले नाही तर अपील करता येणे शक्य आहे. या विधेयकानुसार आपले कर्तव्य बजावण्यात हयगय करणाऱ्या अधिकाऱ्यास ५०,००० पर्यंत दंड होऊ शकतो.

---

[2] पुणे महानगरपालिकेची नागरिकांची सनद– http://punecorporation.org/pmcwebn/Citizen_Charter.aspx

या तरतुदींमुळे नागरिकांची सनद ही गोष्ट केवळ कागदावर न राहता अधिक प्रभावी ठरू शकेल. आणि शासकीय सेवा आणि वस्तू नागरिकांना विनाविलंब मिळण्याची शक्यता वाढेल.

## अंमलबजावणी करताना येणारी अडचण

वेळेत आणि दर्जेदार सेवा पुरवण्यासाठी आवश्यक असे पुरेसे आणि प्रशिक्षित मनुष्यबळ प्रत्येक शासकीय विभागात असणे आवश्यक आहे. पुणे महानगरपालिकेचे उदाहरण बघितले तर जवळ जवळ एक हजार पदे रिक्त आहेत. ज्यामुळे सेवेत असलेल्या कर्मचाऱ्यांवर अतिरिक्त कामाचा भार पडतो. शिवाय निवडणूक आणि जनगणनेच्या कामातही शासकीय कर्मचाऱ्यांवर अतिरिक्त जबाबदाऱ्या टाकण्यात येत असल्याने नागरिकांची सनद प्रभावीपणे अंमलबजावणीत आणणे कठीण आहे.